

दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ५९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१२ ऑक्टोबर २०२४

दिव्यात पाण्यासाठी मनसेकडून प्रभाग समितीवर तिरडी यात्रा...

सत्ताधारी पाणीप्रश्न सोडविण्यात अपयशी - तुषार पाटील

अक्षराज : विनोद वास्कर

दि.११, दिवा (ठाणे) : गेली अनेक वर्षांपासून दिवा शहराचा पाणीप्रश्न सोडविण्यास सत्ताधाऱ्यांसह प्रशासनाला अपयश आले असल्याचे उघड झाले आहे.

दिव्यात पाण्यासाठी बेडेकर नगर वासियांना गेले अनेक महिने भेडसावत असलेल्या पाणी प्रश्नावर दिवा प्रभाग समितीवर तिरडी यात्रा काढावी लागली. ठाणे महानगर पालिकेच्या पाणी पुरवठासुरळीत करण्यात अपयश आल्याने अधिकाऱ्यांना झोपेतून जागे करण्यासाठी दिवा मनसेच्या वतीने दिवा प्रभाग समितीवर सर्व बेडेकर नगर येथील नागरिकांकडून तिरडी घेऊन म ोर्चा काढण्यात आला.

दिव्यातील बेडेकर नगर वासियांना होत नसलेल्या पाणी पुरवठ्याबाबत ३१ जुलै आणि २४ सप्टेंबर अशा २ वेळा पालिकेकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. परंतु पाणीप्रश्न न सुटल्याने व पाणी असून मिळत नसल्याने राहिवश्यांना टँकरचे विकतचे पाणी लगेच मिळते पण तेच पाणी आमच्या पाण्याच्या लाईनला येतच नाही. आम्ही हे असे किती दिवस विकतच पाणी घ्यावे लागत आहे.

जिवंत माणसांना समस्या, अडचणी समजतात पण मेलेल्या माणसांना त्या समजत नाही. तर या अशा मुर्दाड पालिका अधिकाऱ्यांना समजत नाही अशी प्रतिक्रिया मनसेच्या अंकिता कदम यांनी दिली तर पाणीप्रश्न सोडविण्यासाठी दिवा शहर मनसे अध्यक्ष तुषार पाटील यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. प्रसंगी दिवा प्रभाग समितीचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता साळुंखे यांनी बेडेकर नगर वासियांचा पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी सकारात्मक निर्णय देऊन उद्यापासून काम सुरु होईल असे आश्वासन दिले आहे.

अहमदनगर जिल्हा आता 'अहिल्यानगर' महसूल व वन विभागाकडून अधिसूचना जारी

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, अहिल्यानगर : राज्य सरकारने अहमदनगर शहर पाठोपाठ आता जिल्ह्याचे ही नामांतर अहिल्यानगर असे केले आहे. या संदर्भात महसूल व वन विभागाने मंगळवारी अधिसूचना प्रसिध्द केली. यामध्ये जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर केल्याचे तसेच उपविभागाचे अहिल्यानगर, अहमदनगर तालुक्याचे अहिल्यानगर व अहमदनगर गावाचे अहिल्यानगर असे नामांतर केल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, महापालिकेने केलेले नामांतर पुसून टाकण्याचा प्रकार बुधवारी उघडकीस आल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी महापालिका आयुक्तांच्या विरोधात आंदोलन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन वर्षांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चोंडी (ता. जामखेड) येथील जयंतीच्या कार्यक्रमात नगरचे नामांतर करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर केंद्र सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी अहमदनगर शहराचे अहिल्यानगर असे नामांतर केल्याची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. हे केवळ नगर शहराचे नामांतर झाले, जिल्ह्याचे नाही. अशा काही प्रतिक्रिया व्यक्त करत संभ्रमावस्था निमाण करण्यात आली होती. त्यानंतर आता महसूल व वन विभागाने अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर केल्याचे तसेच उपविभागाचे अहिल्यानगर, अहमदनगर तालुक्याचे अहिल्यानगर व अहमदनगर गावाचे अहिल्यानगर असे नामांतर केल्याची अधिसूचना जारी केली आहे. त्यातून संभ्रम दूर केल्याचे मानले जाते. दरम्यान, शहराचे अहिल्यानगर असे नामांतर केल्याची आधिसूचना जारी केल्यानंतर मनपाने लगेच जुन्या प्रशासकीय इमारतीवर व अग्निशमन केंद्रावर अहिल्यानगर असे नाव कोरले. परंतु सोमवारी रात्री ते पुसण्यात आले. हा प्रकार बुधवारी लक्षात आल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मानपामध्ये आयुक्तांच्या विरोधात आंदोलन केले. यासंदर्भात बोलताना दिगंबर गेंट्याल यांनी सांगितले की, काहींच्या तक्रारीला घाबरून आयुक्तांनी राज्य सरकारचा आदेश असूनही नामांतराचा फलक पुसण्याचे आदेश दिले. त्यामुळे आमच्या भावना दुखावल्या आहेत. पुन्हा नामांतराचा फलक लावला जाईल, असे आश्वासन दिले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

ऐतिहासिक घटना जिल्हा नामांतराच्या बाबतीत महायुती सरकारने वचनपूर्ती केली आहे. अहिल्यादेवीचे स्मारकही उभे करू,असा विश्वास महसूलमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाला तिनशे वर्ष यंदा पूर्ण होत असताना जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव जिल्ह्याला देता आले ही ऐतिहासिक घटना आहे. नामांतराची सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे पालकमंत्र्यांनी आभार व्यक्त केले.

निलेश लंके प्रतिष्ठानच्या मोहटादेवी यात्रोत्सवाची उत्साहात सांगता

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, अहमदनगर : खासदार नीलेश लंके व जिल्हा परिषदेच्या सदस्या राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आयोजित करण्यात आलेल्या मोहटादेवी यात्रोत्सवामध्ये तिच गर्दी आणि तोच उत्साह पहावयास मिळाला.

पारनेर तालुक्याप्रमाणेच नगर तालुक्यातील महिला मोठया उत्साहाने या यात्रोत्सवात सहभागी झाल्या होत्या. फुलांची उधळण करीत खा. नीलेश लंके व राणीताई लंके यांचे नगरकरांनी जंगी स्वागत केले. पारनेर तालुक्यातील यात्रोत्सावाची सांगता झाल्यानंतर बुधवारी नगर तालुक्यातील देहरे, नांदगांव, शिंगवे नाईक, इस्लामपुर, पिंप्री घुमट, वडगांव गुप्ता, हमीदपुर, हिंगणगांव, खातगांव टाकळी, टाकळी खातगांव, हिवरे बाजार, विळद, निमगांव घाणा, कर्जुने खारे, नवनागापुर, इसळक, निंबळक, नेप्ती, निमगांव वाघा, जखणगांव आदी गावांमधील महिला या यात्रोत्सवात सहभागी झाल्या होत्या.

नगर शहराच्या वतीने महापौर अभिषेक कळमकर व प्राची कळमकर यांनी उपस्थित माता-भगिनींचे स्वागत केले. यावेळी प्रियंका लामखडे, राजेंद्र नरवडे, अजय लामखडे, वसंत पवार, शिवा पाटील होळकर यांचीही भाषणे झाली.

नगर तालुका व शहर यात्रेसाठी प्रिती कळमकर, शिवा पाटील होळकर, अजय लामखडे, प्रियंका लामखडे, वसंत पवार यांनी विशेष परीश्रम घेतले. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती वसंतराव पवार, बाजार समितीचे संचालक शिवाजी पाटील होळकर, अजय लामखडे, राजू नरवडे, संजय पाटील, संजय जपकर, घनश्याम म्हस्के, अण्णासाहेब शिंदे, बी आर कर्डीले, तात्यासाहेब कर्डीले, अनिल नरवडे, गौरव नरवडे, बाबा काळे, हरिदास जाधव, नंदकुमार सोनवणे, नितीन भांबळ उपस्थित होते.

यात्रेप्रती ओढ आणि उत्साहामुळे उर्जा गेल्या शुक्रवारपासून सुरू झालेल्या या यात्रोत्सवात मोठ्या संख्येने माता भगिनी सहभागी झाल्याबद्दल सर्वांप्रती कृतज्ञता, प्रत्येक दिवशी माता भगिनींमध्ये दिसणारा उत्साह, यात्रेप्रती असलेली ओढ पाहून मला मोठी उर्जा मिळते. सर्व माता भगिनींनी काळजीपूर्वक दर्शन घ्यावे. तिसगाव येथे सर्वांसाठी फराळाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

- राणीताई लंके, माजी जिल्हा परिषद सदस्या

तुमची लेक विधानसभेत पाठवा लोकसभा निवडणूकीमध्ये खा. निलेश लंके हे उतरल्यानंतर त्यांना सर्वसामान्य जनतेचे पाठबळ मिळाले कारण गेल्या पाच - सात वर्षांमध्ये त्यांनी सर्वसामान्यांचे हित जोपासण्यासाठी २४ तास ३६५ दिवस घेतलेल्या परिश्रमाचे ते फळ होते. निलेश लंके हे धनशक्ती विरुद्ध जनशक्तीच्या लढतीमध्ये मोठ्या मताधिक्याने विजयी व्हावेत यासाठी अनेक मात भगिनींनी नवस केले होते. या यात्रेच्या निमित्ताने ही नवसपूर्ती होत असल्याचाही आनंद आहे. आता खा. निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई या विधानसभेच्या निवडणुकीतील उमेदवार असणार आहेत. त्यांचे माहेर नगर तालुक्यातील असल्याने तुमची लेक म्हणून राणीताईंना विधानसभेत पाठवा.

- माजी महापौर अभिषेक कळमकर

श्री तुळजाभवानी देवीजींची महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा

अक्षराज : संगीता वनकळस

दि.११, धाराशिव : शारदीय नवरात्र महोत्सवात शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी दुर्गाष्टमीच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीजींची महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली.

श्री तुळजाभवानी देवीजींच्या नित्योपचार पुजा आणि अभिषेक पूजेनंतर आज महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात आली. ज्यावेळी महिषासुराने देवतांना हाकलून दिले व स्वत: स्वर्गाचा आनंद भोगू लागला, त्यावेळी साक्षात पार्वती अवतार असलेल्या श्री तुळजाभवानी माता सर्व देवांच्या तेजापासून उत्पन्न झालेली जगदंबा माता भवानी आहे. हिने सर्व दैत्यांचा राजा महिषासुराचा वध केला व सर्व देवतांना स्वर्ग प्राप्तीचा आनंद दिला. त्यामुळे देवीला महा अलंकार घालण्यात येऊन महिषासुर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येते.अशी आख्यायिका सांगितली जाते. तत्पूर्वी दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री सातव्या माळेच्या दिवशी अभिषेक पूजेनंतर देवीला वस्त्र अलंकार चढविण्यात आले. त्यानंतर धूप आरती करण्यात आली. रात्री श्री तुळजाभवानी मंदिरात मोर वाहनावरून छबिना मिरवणूक काढण्यात आली.

अतिक्रमण विभागामार्फत बेलापूर विभागात तोडक कारवाई

अक्षराज : जे. के. पोळ

दि.११, नवी मुंबई : महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ.राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर येथे निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत करावे गांव नवी मुंबई येथील १) संताजी नाईक घर नं ८७३, सेक्टर-३६, करावे गांव, २) प्रतिक संताजी नाईक, घर क्र.९९६ से.३६ तसेच ३) लहू काशिनाथ सांगडे, घर क्र.-२३३, से-३६, करावे गांव यांनी पालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

सदर अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

अे-विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन १) संताजी नाईक घर नं. ८७३, सेक्टर-३६, करावे गांव यांचे अनधिकृत बांधकाम, २) प्रतिक संताजी नाईक, घर क्र.९९६ से.३६ करावे गांव यांचे अनधिकृत बांधकाम दि. १०.१०.२०२४ रोजी निष्कासित करण्यात आले आहे. तसेच ३) श्री. लहू काशिनाथ सांगडे, घर क्र.-२३३, से-३६, करावे नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकाम दि. ३०. ०८. २०२४ रोजी निष्कासित करण्यात आले होते. तदनंतर संबंधितांनी पुनश्च: बांधकाम सुरु असल्याचे निर्दशनास आल्याने प्रबोधन मवाडे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी - बेलापूर, यांचे नियंत्रणाखाली या धडक मोहिमेसाठी मयुरेश पवार, कनिष्ठ अभियंता व विभागातील इतर अधिकारी, कर्मचारी यांचे समवेत कारवाई करणेत आली. सदर मोहिमे साठी मजूर, हॅमर, गॅसकटर इत्यादी साधन सामुग्री तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते.

टिटवाळ्यात रिक्षा चालकाच्या भांडणामुळे प्रवाशाचा मृत्यू

अक्षराज : संजय पंडित

दि.११, टिटवाळा(ठाणे) : प्रवाशांशी वाट्टेल तसं वागणं, भाडं नाकारनं,उद्धट भाषेचा वापर,वाटेल तशी मनमानी.अवास्तव भाडे आकाराने इत्यादी कारणांमुळे रिक्षाचालक कायमच चर्चेत असतात. अशातच आता टिटवाळा येथील एका रिक्षा चालकाच्या मजोरी पणामुळे एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कल्याण आणि आसपासच्या परिसरात देखील दिवसेंदिवस रिक्षा वाल्यांची मुजोरी वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर टिटवाळ्यात अतिशय धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रिक्षा चालकाला भाडे देण्यासाठी प्रवाशाने ५० रुपयांची नोट काढली. ही नोट फाटली असल्याने रिक्षा चालक आणि प्रवासी यांच्यामध्ये जोरदार भांडण झाले. भांडणात झटापटीमुळे प्रवासी अंशूमन शाही यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी टिटवाळा पोलिसांनी रिक्षा चालक राजा भोईर याच्या विरोधात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी रिक्षा चालक राजा भोईर याला अटक केली आहे. या बाबत सविस्तर हकीकत अशी की,टिटवाळ्यातील हरी ओम व्हॅली बिल्डींग नंबर ७ मध्ये अंशूमन शाही हे त्यांच्या कुटुंबासोबत राहत होते. त्यांना एक मुलगी आणि पत्नी असा परिवार आहे. गुरुवार रात्री रिक्षातून ते घराजवळ आले. या वेळी त्यांनी प्रवासी भाडे देण्याकरीता ५० रुपयांची नोट काढली. त्यावेळी रिक्षा चालकाने त्यांच्या जवळील ५९ रुपयांची नोट फाटकी असल्याने ती घेण्यावरुन वाद झाला. या वादात रिक्षा चालक आणि अंशूमन यांच्या हाणामारी झाली. या हाणामारीत अंशूमन हे बेशुद्ध होऊन खाली कोसळले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. त्यांचा या घटनेत मृत्यू झाला.

दसरा सण मोठा...

आज आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजया दशमी. दसरा म्हणूनही हा सण सर्वत्र साजरा केला जातो. दसऱ्याच्या आधी नऊ दिवस देवीचा जागर करून नवरात्र साजरा केला जातो. नवरात्रीची सुरुवात आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवशी घट बसवून केली जाते. नऊ दिवस देवीची आराधना केल्यानंतर दहाव्या दिवशी दसरा साजरा केला जातो. दसरा सणासारखा आनंद इतर कोणत्याही सणात नसतो म्हणूनच

दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा असे म्हंटले जाते. देवीने महिषासुराशी युद्ध करून त्याला मारला तोच हा दिवस. प्रभू रामरायांनी रावणाचा वध केला तो हा दिवस. रजपूत काय किंवा मराठे वीर काय ह्यांनी युद्ध मोहिमांना प्रारंभ केला तोच हा दिवस. ह्या दिवशी शस्त्र पूजा सुद्धा करतात. पाटीवर सरस्वती काढून तिची पूजा करतात. पराक्रमाचा आनंद देण्या-घेण्याचा परस्परांत प्रेम वाढवण्याचा हा एक दिवस सुंदर सण-दसरा. अज्ञानावर ज्ञानाने, शत्रूवर पराक्रमाने, वैऱ्यावर प्रेमाने विजय मिळवायचा. आंनद, समाधान आणि सोबत संपदा मिळवून आणायची. यश किर्ती प्राप्त करायची धनसंपदा लुटायची आणि लुटवायची हा दिवस. दसरा ह्या सणांच मोठ्या उत्साहाने स्वागत होते. हा साडेतीन मुहुर्तातला एक मुहुर्त म्हणूनच दसऱ्याच्या मुहुर्तावर नवी खरेदी, नवे करार, नव्य योजनांच्या प्रारंभ इ. चांगल्या गोष्टी केल्या जात. घर, गाडी, बंगला, खरेदी केला जातो. सोन्या चांदीचे दागिने केले जातात. नवे व्यवसाय चालू केले जातात. नवी नाटके, चित्रपट ह्यांचे मुहुर्त होतात. पुस्तक प्रकाशीत केली होतात. ह्या दिवशी घरोघरी मिष्टान्नाचा बेत केला जातो. संध्याकाळी आपट्याची पाने सोनं म्हणून लहानांनी मोठ्यांना द्यायची. त्यांच्या पाया पडायचे आणि लाख मोलाचे आशिर्वाद घ्यायचे ते ही ह्याच दिवशी. हा सण प्रत्येकाला आनंद देऊन जाणारा आहे. विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या आपणास व आपल्या परिवारास मनपुर्वक शुभेच्छा!

'विजयादशमी' चे महत्व...!

विजयादशमी हा भारतात प्रत्येक वर्षी नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दहाव्या दिवशी साजरा केला जाणारा एक प्रमुख हिंदू सण आहे. याला 'दसरा' या नावानेही ओळखले जाते. विजयादशमी आश्विन महिन्याच्या दहाव्या दिवशी साजरी केली जाते. या वर्षी १२ ऑक्टोबर (शनिवार) या दिवशी येत आहे. विजयादशमी म्हणजेच आश्विन शुद्ध दशमी हा दिवस भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा मानला जातो. भारताची समृद्ध संस्कृती आणि परंपरा प्रतिबिंबित करणारा दसरा सण साजरा केला जातो. भारतात हा सण दहा दिवस साजरा करतात. भारतातील विविध प्रांतांत वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. भारताच्या दक्षिणेकडील, पूर्वेकडील, ईशान्येकडील आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये विजयादशमीला दुर्गा - पूजेची समाप्ती होते. या दिवशी देवी दुर्गाने महिषासुर या राक्षसावर विजय मिळवून धर्माचे रक्षण केले. उत्तर, मध्य, आणि पश्चिम राज्यांमध्ये या सणाला रामलीला समाप्ती होते. श्रीरामाने रावणावर केलेल्या विजयाचे स्मरण केले जाते. देवी दुर्गा सिंहावर स्वार झालेली असो किंवा देवी अंबा वाघावर स्वार होऊन असो. संदेश सुसंगत राहतो. देवीला जगाचे रक्षण आणि संरक्षण करण्यासाठी हस्तक्षेप करावा लागला. जे वाईटावर धार्मिकतेच्या विजयाचे प्रतिक आहे. विद्येची देवता मानल्या गेलेल्या सरस्वती देवीचे पूजन या दसऱ्याच्या दिवशी केले जाते. विद्यार्थी

पाटीवर सरस्वतीचे प्रतिकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा केली जाते. या दिवशी शस्त्र पूजन केले जाते. विजयादशमीच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे. लोक या दिवशी परस्परांना सोने म्हणून आपट्याची पाने देतात.आपट्याच्या झाडाची पूजा करतात. विजयादशमीच्या दिवशी देवीची मिरवणूक काढून देवीला पाण्यात विसर्जित केले जाते. या दिवशी नवरात्रीची सांगता होते. विजयादशमीच्या दिवशी वाईटाचे प्रतीक असलेल्या रावणाच्या भव्य पुतळ्याचे दहन केले जाते. हे रावणदहन वाईटाचा नाश असल्याचे प्रतिक मानले जाते. शेतकरी आपल्या शेतातील पहिले पीक यावेळी घरात आणून त्याची पूजा करतो. विजयादशमी साजरी करण्यामागील इतिहास विजयादशमीचे महत्त्व सम जून घेण्यासाठी प्राचीन धर्मग्रंथ, हिंदू पौराणिक कथांचा अभ्यास केला पाहिजे. महिषासुर राक्षसाला भगवान ब्रह्मदेवाकडून वरदान होते. ज्यामुळे त्याला विश्वातील कोणत्याही पुरुषाकडून मारले जाणार नाही हे वरदान होते. त्यामुळे त्याने धरती व स्वर्गावर हल्ला करून सर्व देवतांचा पराभव केला. या संकटाचा सामना करण्यासाठी सर्व देव आदिशक्तीकडे गेले. आदिशक्तीने दहा हातांनी देवी दुर्गेचे रूप धारण केले. दहा दिवस महिषासूर व दुर्गेचे भीषण युद्ध झाले.अखेर महिषासूराला पराभूत करून विजय मिळवला. चांगल्याचा नेहमी वाईटावर विजय होतो. विजय उत्सव म्हणून आपण विजयादशमी साजरी करतो. या दिवशी पांडव अज्ञातवास संपवून परत निघाले अशीही आख्यायिका आढळून येते. पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी आपली शस्त्रे शमीच्या झाडावर लपवून ठेवली होती. त्यामुळे विजयादशम ीला शमीच्या झाडाची पूजा करून त्याचे औक्षण केले जाते. रामायणानुसार रावणने माता सीतेचे अपहरण केले आणि तिला लंकेत घेऊन गेला. श्रीराम व रावणामध्ये भीषण युद्ध झाले . श्रीरामाने विजयादशमीच्या दिवशी रावणाचा वध केला. या दिवसाची आठवण म्हणून सत्याचा असत्यावर विजय, न्यायाचा अन्यायावर विजय म्हणून या दिवशी भारतात सर्वत्र रावणाचा पुतळा जाळला जातो. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त मानल्या गेलेल्या विजयादशमीला एखाद्या नवीन कार्याची सुरुवात करतात. घर, नवीन वाहने, वस्तु तसेच कपड्यांची खरेदी, सोन्याची खरेदी होते, विजयादशमीच्या दिवशी सोन्याची म्हणजे आपट्याच्या पानांची देवघेव करून सायंकाळी घरी यायची प्रथा आहे. सायंकाळी सोन् लुडुनी मोरू परतुनि आला,बहिण काशी ओवाळी मग त्याला, दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा !

- श्रीराम साहेबराव महाजन
कामोठे. नवी मुंबई

नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची चाचणी यशस्वी...

अक्षराज : जे. के. पोळ

दि.११, पनवेल : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची आज यशस्वी चाचणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. वायुदलाचं सी-२९५ या विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. या विमानांना वॉटर कॅनानद्वारे अनोखी सलामी देण्यात आली. याबरोबरच लढाऊ सुखोई -३० विम ानानेही यशस्वी फ्लायपास केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विमानतळाच्या धावपट्टीची आज चाचणी करण्यात आली. या चाचणीनंतर सुखोई-३० या लढाऊ विमानानेही फ्लायपास केला. लँडींग करणाऱ्या सी- २९५ विमानाच्या वैमानिकाचा मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडको म हामंडळाचे अध्यक्ष, संजय शिरसाट, खा.श्रीरंग बारणे, खा.सुनील तटकरे, खा.डॉ. श्रीकांत शिंदे, खा.नरेश म्हस्के, आ.गणेश नाईक, आ.प्रशांत

ठाकूर, आ.महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इकबाल चहल, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सी-२९५ विमान हे गांधीनगरहून तर सुखोई हे पुण्यातून आलं होते.

यावेळी माध्यमाशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजचा दिवस इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठा आनंद आहे.

मार्च २०२५ मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच सिडको ने केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल सर्व टीमचे अभिनंदन केले. हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे आश्रयस्थान बनेल तसेच यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. या विमानतळामुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील, तसेच इथे आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्रे उभारली जातील असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

नवी मुंबई विमानतळाचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या विमानतळावरुन दर वर्षी अंदाजे ९ कोटी प्रवासी प्रवास करतील असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शिवडी न्हावाशेवा सी लिंक, मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो, दोन खाडी मार्गाने जोडला जात असून तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार आहे.

त-हाडी परिसरात कपाशीवर लाल्या रोगाचे आक्रमण

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, शिरपूर : यंदाच्या हंगामात शिरपूर तालुक्यात ५५ हजार ६७७ हेक्टरवर शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली. कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतातील कापसाचे एक दोन वेचे निघाले. मात्र यावर्षी लाल्या रोगाचे आक्रमण झाल्याने हिरवी पाने लालसर होऊन गळून पडत आहेत. यामुळे शेतकरी धास्तावला आहे. दरम्यान मेटाकुटीस आलेल्या बळीराजाला आता हातचे पीक गमावण्याची वेळ आली आहे. यंदा एकामागून एक अस्मानी संकट बळीराजाचा पाठलाग करीत याचा सामना करून कसेबसे पीक वाचविले. यातून किमान मशागतीचा खर्च निघेल अशी अपेक्षा बळीराजाला होती. मात्र आता कपाशीवर लाल्या रोगाचे आक्रमण झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. शिरपूर तालुक्यातील त-हाडी सह परिसरातील शेतकऱ्यांनी शासनानकडे आर्थिक मदतीची मागणी केली आहे. कपाशी पिकावर लाल्याने आक्रमण केल्याने, उभे पीक वाळत आहे. यामुळे शेतकऱ्यांचा जीव टांगणीला आला आहे. एकीकडे कर्जाचा वाढता डोंगर आणि उत्पन्नाची हमी शून्य अशा विदारक स्थितीचा सामना करण्याकरिता शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करणे गरजेचे ठरत आहे. त-हाडी परिसरातील शेतकरी हवालदिल झाला आहे. या भागातील कपाशीचे पीक लाल्याच्या विळख्यात सापडले आहे. यामुळे पिके वाळत आहे. काही शेतात तर संपूर्ण पीक वाळले असून उत्पन्नाची हमी राहिलेली नाही. सध्या कपाशीचे बोंडे परिपक्व होऊन कापूस वेचणीचा हंगाम सुरु आहे. असे असताना मात्र काही भागात कपाशीवर लाल्या व मर रोगाने आक्रमण केले आहे. कपाशीची हिरवीगार पाने लाल पडून वाळत आहेत. तर वरुळ भटाणे परिसरात काही भागात मर रोग आल्याने झाडे वाळत आहेत. त्यामुळे याचा परिणाम कापसाच्या उत्पादनावर होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

दसरा सोने...

दस-यांस स्वर्णखरेदी
ही परंपरागत कावड
बावनकशी रे शुध्दत्व
करी चोखंदळ निवड

निमित्ताने बचतभली
आपसूक होई आवड
स्व धन आपले कामी
असेल जेधवा निकड

हरेक जण घेतो सोने
स्थितीअसून अवघड
भावभिडले गगनाला
ऊरात किती धड धड

मुहूर्त नको टाळायला
कशी केवढी धड पड
केलीचं पाहिजे खरेदी
असो भावजरी वरचढ

फायदाघेतातव्यापारी
कळेना कुणा लफ्फड
तिजोरी भरेसोनारांची
बजेट वाजते खडखड

कुणी म्हणेल सोने हे
तिजोरी बंदिस्त दगड
गुंतवून ठेवावी लक्ष्मी
कमाई ज्याला रगड

- हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६.

अक्षराज
अचूक... अचूक... हातमी

सर्वसामान्यांच्या मुलभूत विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी मी राजकारणात आलोय

अक्षराज : संभाजी कदम

दि.११, भोकर (नांदेड) : राष्ट्रीय काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे ८५-भोकर विधानसभा मतदार संघातून इच्छूक उमेदवार म्हणून उमेदवारी मागणारे एक व्रतस्थ समाजसेवक अरुण भाऊ चव्हाण यांनी त्याविषयी मांडलेली भूमिका...

मी भोकर विधानसभा मतदार संघातील चिदगिरी ता.भोकर तेथील एक समाजसेवक असून सामाजिक सम स्यांची जाण असल्याने येथील शोषित, पिडीत, वंचित, उपेक्षित समाज व शैक्षणीक, सामाजिक, राजकीय, शेती आणि उद्योग यासह आदी क्षेत्रांतील सर्वसामान्य माणूस म ुलभूत विकासापासून कोसो दूर असल्याचे मला अभ्यासता आले आहे. त्यांच्या समस्या केवळ सामाजिक कार्यातून सुटणाऱ्या नसल्याने राजकीय सत्तेत सहभागी होणे गरजेचे आहे. म्हणूनच सर्वसामान्यांच्या मुलभूत विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मी राजकारणात आलो आहे. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने मला आगामी विधानसभा निवडणुकीत ८५-भोकर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिल्यास महाविकास आघाडीचा आमदार म्हणून मी जनतेचे हे सेवाकर्तव्य पुर्ण ताकदीने पार पाडेल. असा निर्धार राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार अरुण उर्फ अरविंद दिगंबर चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना व्यक्त केला आहे. मौ.चिदगिरी ता.भोकर येथील एक उच्च शिक्षित व समाज सेवेचे व्रत हाती घेऊन गौर सेनेच्या माध्यमातून देशातील २३ राज्यात समाजसेवा करणारे अरुण भाऊ चव्हाण यांसारखे ब्रम्हचारी व्यक्तीमत राजकीय क्षेत्रात आले असून त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे ८५-भोकर विधानसभा मतदारसंघातून आगामी निवडणुकीसाठी इच्छूक उमेदवार म्हणून उमेदवारी मागितली आहे. त्या अनुषंगाने त्यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, मी समाज सेवा करण्यासाठी संबंध देश फिरलो आहे. फिरत असतांना अनेकांच्या अनेक समस्या मला अभ्यासता आल्या.

परंतू, देश स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतर ही मी ज्या गावात जन्मलो आहे. त्या गावचा व हे गाव ज्या विधानसभा मतदार संघात आहे. त्या भोकर विधानसभा मतदार संघातील शोषित, पिडीत, वंचित, उपेक्षित समाज आणि शैक्षणीक, सामाजिक, राजकीय, शेती, उद्योग यासह आदी क्षेत्रांतील सर्वसामान्य माणूस मुलभूत विकासापासून कोसो दूर असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. सर्व जाती, पंथ, धर्मातील गरिब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मतदार संघातील भोकर, मुदखेड आणि अर्धापूर या तीन ही तालुक्यात उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये उपलब्ध झाली नाहीत. इंजिनियरींग असो व मेडिकल क्षेत्रातील उच्च शिक्षण घेण्यासाठी नांदेड व अन्य जिल्हा स्थानी जावावे लागते. ही बाब परवडणारी नसल्याने गरिब व होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. तर जे शिकले आहेत त्या गरिब व होतकरू सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल असा कोणताही मोठा उद्योग किंवा रोजगार येथे उपलब्ध झालेला नाही. एम.आय.डी.सी.आहे. परंतू अद्याप तरी येथे एकही मोठा उद्योग किंवा कारखाना उभारण्यात आलेला नाही. एकमेव भाऊराव सहकारी साखर कारखाना आहे. परंतू तो एका बड्या राजकीय नेत्याच्या अधिपत्याखाली असल्याने तो कारखाना सुशिक्षित बेरोजगार किंवा शेतकऱ्यांच्या ही उपयोगाचा नाही.तसेच या मतदार संघात ऊस, केळी, हळद, कापूस, सोयाबीन यांसारखे शेती उत्पन्न मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. परंतू, त्या शेतीमालाला योग्य हमी भाव येथे मिळत नाही किंवा या शेती उत्पनावर प्रक्रिया करणारा मोठा कारखाना, उद्योग नाही व मोठ्या बाजारपेठेत तो माल पाठविण्यासाठी बाजारपेठ ही उपलब्ध नाही. म ोठ्या प्रमाणात सिंचन व्यवस्था ही नाही.यामुळे येथील शेतकरी मुलभूत गरजांपासून वंचित आहे. एकूणच असे की, येथील उपरोक्त घटकांसह सर्वसामान्य माणूस त्याच्या मुलभूत विकासापासून कोसो दूर व वंचित राहिलेला आहे. यांच्या मुलभूत विकासाचा अनुशेष भरुन काढणे अत्यंत

गरजेचे आहे आणि हे कर्तव्य एक निस्वार्थ माणूसच प्रामाणिकपणे करु शकतो. यासाठी राजकीय सत्तेत सहभागी होणे ही गरजेचे आहे. म्हणूनच माझी सामासेवी भुमिका सोबत घेऊन राजकीय क्षेत्रात मी आलो आहे. अविवाहित राहून अखंडी हयात जनसेवा करण्याचे मी व्रत्त हाती घेतलो आहे. मी एक अविवाहित व्यक्ती असल्याने राजकीय क्षेत्रात येऊन 'अर्थकारण' करण्यात माझा कुठलाही वैयक्तिक स्वार्थ नाही व जनसेवेसाठी मी २४ तास उपलब्ध होऊ शकतो आणि सर्वसामान्यांचे मुलभूत प्रश्न मी सोडवू शकतो. या निस्वार्थ सेवा भावानेच मी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना भाऊ पटोले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन पक्ष प्रवेश केलो आहे. राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीतील घटक पक्ष हे 'सेक्युलर' विचार धारेचे असल्याने सर्व धर्मातील वंचितांचे प्रश्न ते सोडवू शकतात, असे माझे मत असून मतदार संघातील बंजारा समाज आणि इतर सर्व समाजातील बहुसंख्य मतदार बांधव माझ्या पाठीशी आशिर्वादरुपाने उभे आहेत. या बळावर व विश्वासावरच मी राष्ट्रीय काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे भोकर विधानसभा मतदार संघातून इच्छूक उमेदवार म्हणून उमेदवारी मागितली असून मला उमेदवारी दिल्यास मी नक्कीच विजयी होईल व सर्व सामान्यांचे मुलभूत प्रश्न सोडविन, असा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. एका विशिष्ट समाजातील व केवळ तीन घराण्यातील व्यक्तींनीच भोकर विधानसभा मतदारसंघातून आजपर्यंत आमदारकी उपभोगली आहे. तर आता ओबीसी समाजातील चेहरा अरुण भाऊ चव्हाण यांनी पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारी मागितली आहे, हे त्या विशिष्ट समाजातील उमेदवारांपेक्षा वेगळेपण आहे. पाहुयात त्यांना पक्षश्रेष्ठी उमेदवारी देते का ते ? दिल्यास नक्कीच सुजाण मतदारांचा कौल त्यांया बाजूने राहिलं असे वाटते. त्यासाठी त्यांना खुप खुप हार्दिक शुभेच्छा!

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

मनसेचे प्रमोद गांधी घेतायत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी

अक्षराज: उदय दणदणे

दि.१०, गुहागर : महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या संयोगाने व त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील मुलांची आरोग्याची काळजी घेत जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या आरोग्य तपासणी शिबिराला उदंड प्रतिसाद मिळत असून गेली १५ दिवस सदर शिबीर विविध जि. प. शाळांत राबविले जात आहेत.

चष्मा, रक्तगट तपासणी नाक, कान, घसा अश्या आरोग्य विषयी ह्या तपासणी होत आहेत. मंगळवार दि.०८ ऑक्टोबर २०२४ रोजी जि. प.शाळा अडूर भाटले येथे सदर आरोग्य तपासणी शिबीर अपरांत हॉस्पिटल डॉ.रजनिश रेडीज -मेडीकल प्रमुख, सचिन पोकळे -जनसंपर्क अधिकारी, नर्स स्टाप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात जवळ जवळ ८० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर शिबिराला शाळा समिती सह मुख्याध्यापक प्यारेलाल मोते यांचे विशेष सहकार्य लाभले. तर मनसे तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर, उप तालुकाध्यक्ष जितेंद्र साळवी, नितीन कारकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबीर यशस्वी होण्यासाठी पालशेत विभाग अध्यक्ष प्रसाद विखारे, रोहित दणदणे, सुजल कुळे सह मनसे सैनिक यांनी मेहनत घेतली.

गुहागर मनसेच्या पालशेत-निवोशी विभागाच्या पद नियुक्त्या जाहीर

अक्षराज : उदय दणदणे

दि.११, निवोशी (गुहागर) : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर वतीने पालशेत-निवोशी ग्रामपंचायत महसूल क्षेत्रातील मनसेच्या नूतन पद नियुक्त्या जाहीर करण्यात आली असून पालशेत विभाग अध्यक्षपदी प्रसाद विखारे, पालशेत विभाग महिला अध्यक्षपदी अनिता दणदणे, निवोशी शाखा अध्यक्ष पदी संदेश धावडे, निवोशी शाखा उपाध्यक्ष अनिल दणदणे आदी मनसे कार्यकर्त्यांची पद नियुक्त्या करण्यात आली आहे. मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी, जिल्हाध्यक्ष संतोष नलावडे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर, तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांच्या उपस्थितीत, मार्गदर्शनाखाली, शुभहस्ते निवडपत्र देत शुभेच्छा देण्यात आल्या. आगामी विधानसभा व ग्रामपंचायत, पंचायत समिती अशा विविध निवडणुकीत मनसेला मोठ्या मताधिक्याने या निवडणुकीत यश मिळवायचे आहे. पालशेत- निवोशी विभागात मनसे पक्ष घराघरांत पोहचण्यासाठी याठिकाणी येथील मनसे सैनिक जोमाने तयारीला लागले आहेत. पालशेत-निवोशीत गावच्या राजकीय पटलावर मनसेने दमदार असे पाऊल टाकले असून त्यामुळे इथे प्रस्थापित पक्षांना मोठे आव्हान उभे राहिले आहे.

आदर्श विद्यालयाच्या खेळाडूंचे जिल्हास्तरीय शालेय सेपकटकरा स्पर्धेत यश

अक्षराज : धर्मेंद्र वर्पे

दि.११, दहिवडी (सातारा) : आदर्श विद्यालयाच्या खेळाडूंचे जिल्हास्तरीय शालेय सेपकटकरा स्पर्धेत यश क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद सातारा, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा, सातारा सेपकटकरा असोसिएशन व दहिवडी कॉलेज दहिवडी यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सेपकटकरा स्पर्धा नुकत्याच दहिवडी येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत आदर्श विद्यालयाच्या १४ वर्षाखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव संघाचा पराभव करून विजेतेपद मिळवले. या संघाची दहिवडी येथे होणाऱ्या कोल्हापूर विभागीय शालेय सेपकटकरा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या संघात सार्थक संतोष हाडके, वैभव मल्लिनाथ नेरके, आयुष सचिन भोईटे,सार्थक तुकाराम तालवर, आदर्श सत्यवान जाधव या खेळाडूंचा समावेश होता.१४ वर्षाखालील मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला. या संघात प्रणाली दत्तात्रय गाडे, आदिती अनिल पानसरे, सानिध्या नारायण आवडे, मयुरी गौतम शिंदे व रिया सचिन पानसरे या खेळाडूंचा सहभाग होता.१९ वर्षाखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाडूचे प्रदर्शन करून तृतीय क्रमांक मिळवला.या संघात प्रणाली मारुती कोकरे, ईश्वरी जयंत असलेकर, रिद्धी संतोष पवार, सिद्धी निलेश होमकर, अक्षता चंद्रकांत सोनमळे या खेळाडूंचा सहभाग होता. आदर्श विद्यालयातील रिया सचिन पानसरे, गौरवी गौतम शिंदे, अक्षदा चंद्रकांत सोनमळे, अथर्व विनायक कुंभार या खेळाडूंची दहिवडी येथे होणाऱ्या कोल्हापूर विभागीय शालेय सेपकटकरा निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक चंद्रकांत भोईटे, ग्रंथपाल लता भोईटे यांनी मार्गदर्शन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उदय कबुले, स्कूल कमिटी सदस्य दशरथभाऊ निगडे, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र तांबे, सरपंच रविराज दुधगावकर, रयत शिक्षण संस्था सातारा मध्य विभाग विभागीय अधिकारी नवनाथ जगदाळे, प्रभारी मुख्याध्यापिका प्रमिला कदम, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक वर्ग, विद्यार्थी, पालक यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

माजी आ.सुभाष भोईर यांची अधिकाऱ्यांसोबत साफसफाई आणि कचरा संदर्भात केली चर्चा

अक्षराज : विनोद वास्कर

दि. ११, शिळफाटा (ठाणे) : शिळफाटाच्या परिसरात अनेक दिवसापासून कचरा हा अनेक ठिकाणी पडून होता. आणि काही भागांमध्ये साफसफाई सुद्धा होत नव्हती. त्यासाठी माजी आमदार सुभाष गणू भोईर यांनी दिवा प्रभाग समितीचे अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. डम्पिंग प्रश्न असल्यामुळे कचरा हा उचलला जात नव्हता त्यामुळे साफसफाई सुद्धा होत नव्हती त्यामुळे परिसरात कचऱ्याच्या ढिगारा हा जमा झाला होता. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला होता. तुम्ही काही पण करा पण येथील परिसर स्वच्छ करा आणि हा कचरा उचला असे दिवा प्रभाग समिती अधिकाऱ्यांना सांगितले. दुसऱ्या दिवसापासून शिळ परिसरातील कचरा उचलायला सुरुवात केली आहे. तसेच साफसफाई सुद्धा करण्यात आली आहे. साफसफाई आणि कचरा उचलल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी माजी आमदार सुभाष भोईर यांचे आभार मानले आहेत.

दिवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करताना माजी आमदार सुभाष भोईर, स्वप्निल पावशे विश्वनाथ पाटील, श्याम काठे, प्रसाद पाटील, शक्ती पाटील, असे अनेक पदाधिकारी सुद्धा उपस्थित होते.

राज्यातील संगणक परिचारिकांना न्याय कधी मिळणार ?

अक्षराज : उदय दणदणे

दि.१०, ठाणे : राज्यातील संगणक परिचालक यांचा प्रश्न मांडण्यासाठी रत्नागिरी जिल्हाध्यक्ष- समीर ओक, जिल्हा सल्लागार- स्वप्नील आग्रे, गुहागर तालुकाध्यक्ष- तारेश हळदणकर, सदस्य- मयूर दरीपकर, साईस दवंडे, मंडणगड येथील विधान पवार, प्रसाद जाधव, दापोली तालुका सचिव- अमोल चव्हाण यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांची मंगळवार दि.०८ ऑक्टोबर २०२४ रोजी डोंबिवली येथे सायंकाळी नमो रमो नवरात्रोत्सव आरती वेळी भेट घेतली.

सदर भेटीवेळी रत्नागिरी जिल्हाध्यक्ष समीर ओक यांनी राज्यातील सुमारे २० ते २२ हजार संगणक परिचालक यांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देण्याची आमची मागणी असल्याचे सांगून सदर मागणी पूर्ण करण्यासाठी आपण यात लक्ष घालून आम्हाला न्याय द्यावा अशी आग्रही मागणी करून त्याबाबतचे निवेदन दिले. त्यावेळी मा.चव्हाण यांनी सांगितले की, आता जवळपास ही शेवटची वेळ असून एक कॅबिनेट बैठक शिल्लक आहे. त्यात निर्णय होण्याच्या दृष्टीने मी पूर्ण प्रयत्न करून तुम्हाला न्याय देण्याचा प्रयत्न करतो, ग्रामविकास खात्याकडे याबाबत लेखी स्वरूपातही पाठपुरावा करतो असे सांगितले.

राज्यभरातील सर्व संगणक परिचालकांच्या प्रलंबित मागण्या राज्याचे मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदय तसेच ग्रामविकास मंत्री महोदय यांनी मान्य कराव्यात अशी विनंती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. रविंद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात संगणक परिचालक संघटनेचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष समीर ओक यांनी म्हटले आहे.

दिव्य विद्यालयात दिव्यांग मुलांना स्वास्थ हेल्थ कार्ड व डिजिटल लॉकेट वाटप...

अक्षराज : प्रमोद मौळे

दि.११, जव्हार (पालघर) : आज दि. ११/१०/२०२४ रोजी दिव्य विद्यालय जव्हार येथे दिव्यांग मुलांना स्वास्थ हेल्थ कार्ड व डिजिटल लॉकेट वाटप कार्यक्रम केशवसृष्टी ग्राम विकास योजना अंतर्गत स्वास्थ आयाम मधून करण्यात आला.

यामध्ये ८६ मुलांना स्वास्थ डिजिटल लॉकेट वाटप केले. यामध्ये मुले आजारी पडल्यानंतर डॉक्टरकडे गेल्यावर डिजिटल लॉकेटमधील QR कोड स्कॅन केले की, त्या मुलांचा पूर्ण डेटाची माहिती डॉक्टरला कळेल. जसे त्या मुलाचे नाव, वजन, उंची, BMI व HB यांच्या आधारावर डिजिटल लॉकेट धारक कुपोषित आहे की रक्तक्षय आहे अशी माहीती या डिजिटल लॉकेटम धून डॉक्टरांना लगेच कळणार आहे.

हा केशवसृष्टी स्वास्थ आयामाम धील नाविन्यपूर्ण उपक्रम केशवसृष्टी ग्राम विकास मधील असून जगात व भारतामध्ये पहिलांदाच दिव्य विद्यालय, जव्हार येथे राबविण्यात आला असून याचा फायदा पुढे जावून भारतामधील तसेच जगामधील दिव्यांग मुलांबरोबरच सर्व सामान्य लोकांना त्याचा फायदा होऊ शकतो. या कार्यक्रमाच्या वेळी केशवसृष्टीचे सहकार्यवाह संतोषजी गायकवाड, डिजिटल लॉकेट संकल्पनेचे जनक डॉ. सुरेशजी सरावडेकर

(स्वास्थ आयाम प्रमुख), आशा खोडे, जागृती देसले, जव्हार केंद्र पालक व दिव्य विद्यालय संस्थापिका प्रमिलाताई कोकड, जव्हार केंद्र प्रमुख कैलासजी कुरकुटे तसेच रीना सुरूम (स्वास्थ समन्वयक), सुनिल मरले (स्वास्थ रक्षक दांपत्य), व दिव्य विद्यालयातील मतिमंद व अंध विद्यार्थी व कर्मचारी वृंद यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. सदर डिजिटल लॉकेट सर्कल 3D या कंपनीने तयार केलेले आहेत.

गोरगरिबांना हक्काची घरे मिळावीत, योजनांचा लाभ व्हावा यासाठी प्रयत्न करणार...

अक्षराज : जयराम देमगुंडे

दि.१०, उदगीर(लातूर) : उदगीर विधानसभा मतदारसंघातील अनेक ठिकाणी गायरान जमिनीवर गोरगरीब निराधार लोकांनी गेल्या कित्येक वर्षापासून पिढ्यानपिढ्या वास्तव्य केलेले आहे मात्र दुर्दैवाने राज्यकर्त्यांनी त्यांना अधांतरी ठेवून शासकीय योजना पासून दूर ठेवले आहे. त्या सर्व उपेक्षित घटकांना सोबत घेऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत असे विचार युवा नेते तथा उदगीर विधानसभा मतदार संघाची इच्छुक उमेदवार स्वप्निल अण्णा जाधव यांनी व्यक्त केले आहेत.

गेल्या अनेक वर्षापासून उदगीर शहरातील अनेक भागात राहणाऱ्या लोकांना मध्यंतरी महसूल विभागाच्या वतीने गायरान जमिनी खाली कराव्यात आणि कब्जे काढावेत अशा पद्धतीच्या नोटीस दिल्या होत्या ज्या अत्यंत चुकीच्या आणि निराधार होत्या

मात्र जनतेने शासनाच्या त्या नोटिशीला झुगारून लावून आपण ज्या ठिकाणी राहतो आपल्या पिढ्यान पिढ्या तिथे राहत आहेत तिथे कायम वास्तव्य केलेले आहे. तिथेच राहणे पसंत केले असाच विषय तोंडार ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या तोंडार पाटी येथील गायरान जमिनीवर जवळपास ४० वर्षापासून अनेक गोरगरीब मोलमजुरी जीवन जगणारे राहतात. त्यांनी तिथे घरीही उभा केली आहेत. मात्र त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही कारण त्या गायरान जमिनीवर त्यांचा कब्जा असला तरीही शासनाच्या वतीने त्यांना कबाली दिले नाही, त्यामुळे शासनाच्या घरकुल योजने पासून हे लोक वंचित आहेत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला पाहिजे म्हणून स्वप्निल जाधव यांच्या नेतृत्वाखाली शेकडो लोकांनी मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. या लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभ मिळाला पाहिजे शासनाने सर्वांसाठी घरी ही योजना जाहीर केली आहे. त्या योजनेपासून हे बेघर असलेले लोक का वंचित असा प्रश्नही स्वप्निल जाधव यांनी उपस्थित केला आहे. तसेच त्यांना ते जिथे राहत आहे तिथे नियमित करून त्यांना ग्रामपंचायतीच्या वतीने कबाले द्यावेत तसेच त्यांना ग्रामपंचायतीने नमुना नंबर आठ अ दिला जावा अशी ही आग्रही मागणी या निवेदनामध्ये करण्यात आली आहे. अशाच पद्धतीची परिस्थिती उदगीर शहरातील अनेक प्रभागात आहे त्या सर्वच गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचेही स्वप्निल जाधव यांनी याप्रसंगी सांगितले.

टाकळी ढोकेश्वरच्या सरपंचावरील अविश्वास ठराव फेटाळला ! अरुणा खिलारी सरपंचपदी कायम

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, पारनेर (अ.नगर) : तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील सरपंचावर घेण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर मतदान घेण्यासाठी शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभा बोलावण्यात आली होती. या सभेला १० सदस्य गैरहजर होते. ठराव पारित करायला एक सदस्यांची आवश्यकता असल्याने तसेच ५ सदस्य उपस्थित असल्याने हा अविश्वास प्रस्ताव फेटाळला. सरपंच अरुणा प्रदिप खिलारी यांच्यावर अविश्वास ठराव घेण्यासंदर्भात काही ग्राम पंचायत सदस्यांनी दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्याकडे अविश्वास ठरावा विषयी तक्रार केली होती. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी दुपारी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलावण्यात आली होती. तक्रारीवर उपसरपंच रामभाऊ तराळ यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य शिवाजी सिताराम खिलारी, सुनिता जयसिंग झावरे, अर्चना बापूसाहेब रांधवण, सुनील चव्हाण, दत्तात्रय आनंदा निवडुंगे, गंगाधर निवडुंगे, शुभम सुनील गोरडे, सुमन दिपक साळवे, किशोर गायकवाड, कमल भाऊसाहेब खिलारी, यांच्या स्वाक्षऱ्या असल्याने या सर्वांना सभेला उपस्थित राहण्याची नोटीस बजावण्यात आली होती. या ग्रामपंचायतची सदस्यसंख्या १५ असून, सरंपचाची निवड सदस्यांमधून करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात अविश्वास ठराव आणलेल्या ११ सदस्यांपैकी रामभाऊ तराळ, सुनिता झावरे, दत्तात्रय निवडुंगे, गंगाधर निवडुंगे, सुनील चव्हाण असे ५ सदस्य विशेष सभेला उपस्थित राहून मतदान केले. ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३५ अन्वये १५ ग्रामपंचायत सदस्य असलेल्या, ठिकाणी १५ चे ३/४ म्हणजे ११.३५ मते होतात म्हणजे पुरणांकात १२ सदस्यांनी मते आवश्यक आहेत. या ठिकाणी फक्त ५ सदस्य उपस्थित असल्याने कोरम अभावी १० विरुद्ध ५ ने अविश्वास ठराव फेटाळण्यात आला आहे. यावेळी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्या समोर सरपंच अरुणा खिलारी यांच्यावरील अविश्वास ठराव विशेष सभेत आला नाही. त्यामुळे चर्चा आणि हात उंचावून मतदान केले. अविश्वास ठराव बारगळल्याची माहिती तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी दिली. यावेळी मंडलाधिकारी पंकज जगदाळे, तलाठी एम.आर. उंडे, ग्रामविकास अधिकारी बी. एम. दावभट उपस्थित होते. यावेळी नारायण झावरे, अहमदनगर शहर संदिप घाडगे, जिग्रेश जग्गड,धोंडिभाऊ शेटे, प्रकाश गायकवाड, सचिन आल्हाट, गंगाधर बांडे, सोमनाथ बांडे, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे,विलास नाईकवाडी,शिराज हवलदार, बापूसाहेब रांधवण, दिपक साळवे, अशपाक हवलदार, माजी सरपंच शिवाजी खिलारी, किशोर गायकवाड, शुभम गोरडे,संजय झावरे, विलास धुमाळ, राजेंद्र झावरे, देविदास आल्हाट, सुभाष महाजन जाधव, शुभम निवडुंगे, गोरक्ष निवडुंगे, लक्ष्मण झावरे, बबन झावरे, बबन हरिभाऊ बांडे, बबन सोनबा बांडे, सुरेश झावरे, ज्ञानदेव पायमोडे, तुषार गोरडे, शिवाजी गायकवाड, सौरभ कटारिया, सुहास बांडे, दामोदर झावरे, मंथन गायकवाड, कुंडलिक गायकवाड, ठका गागरे, बाबासाहेब गागरे,निहाल हवलदार, बाबासाहेब सखाराम झावरे, युवराज खिलारी, प्रसाद खिलारी, योगेश खिलारी, दादा निवडुंगे, शिरीष गोरडे, संदिप थोपटे, शिवाजी थोपटे, केशव धुमाळ, भानुदास खिलारी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसीलदार गायत्री सौंदाणे यांच्यासमोर मागील सोमवारी (दि.७) रोजी ११ सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या पत्रावर स्वाक्षऱ्या केल्याने येत्या शुक्रवारी ११ ऑक्टोबरला विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात सभेत ५ सदस्य उपस्थित याप्रमाणे ठराव आला नसल्याने तो बारगळल्याची माहिती तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी दिली.

टाकळी ढोकेश्वर गावच्या विकासासाठी व शांततेसाठी तसेच गावात चूकीचा पायंडा पडणार होता. त्याल चपराक बसावी म्हणून आमच्या भगीनी सरपंच अरुणा खिलारी यांच्या मागे आम्ही ठाम पणे उभे राहून निर्णायक भूमिका घेणारे नारायण झावरे साहेब, माजी सरपंच शिवाजी खिलारी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मी आभार मानतो.

-- महेश पाटील, अध्यक्ष, आदर्श गाव टाकळीढोकेश्वर

गौण खनिज चोरी करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करा...

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११,अहमदनगर : पारनेर तालुक्यातील सुपा - म्हसणे फाटा फेज - २ एमआयडीसीमध्ये रात्रीच्या वेळेत गौण खनिज चोरी करणाऱ्या व बाहेर विकणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी अशी मागणी मनसेचे तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी केली आहे. याबाबत रासकर यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

म्हसणे फाटा फेज २ एमआयडीसीम ध्ये गौण खनिज कारवाईसाठी म नसेकडे स्थानिक शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीवरून अवैध गौण खनिज उत्खनन विषयी कारवाईसाठी मनसे आक्रमक झाली आहे. यामध्ये चार कंपन्यांचा समावेश आहे व इतर कंपन्यांमध्ये चालू असलेले कामे मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन करून तेथील काळी माती बाहेर इतर शेतकऱ्यांना विकली जात आहे. व शासनाची रॉयल्टी रकमेची दिशाभूल केली जाते आणि शासनाची दिशाभूल करण्यासाठी या ठेकेदारांकडून शासन दरबारी थोड्या प्रमाणात ब्रास मुरूम व मातीची रॉयल्टी जमा करतात. शासन दरबारी व त्यानंतर जमा केलेल्या रॉयल्टीच्या आधारे एमआयडीसी हद्दीम ध्ये असलेले डोंगर व इतर ठिकाणी म ोकळ्या प्लॉट या ठिकाणी मुरुम उत्खनन करून कंपनीमध्ये भरतात आणि माती बाहेर विकली जाते.

अशाप्रकारे चालू असलेले काम ाच्या तक्रारी येथिल आजुबाजूच्या शेतकऱ्यांनी मनसेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांच्याकडे वारंवार केल्या होत्या. मनसे नेते रविश रासकर यांनी तक्रारी नुसार या कंपन्यांवर कारवाईसाठी महसूल विभाग तहसीलदार पारनेर, पालकमंत्री, जिल्हाधिकारी व प्रांत यांना निवेदन दिले आहे. रात्रीच्या वेळी या ठेकेदारांकडून व कंपन्यांकडून या अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर कारवाईसाठी एक पथक नेमून त्या पथकाद्वारे किंवा समितीद्वारे आपण सदर कंपन्यांची समक्ष पहाणी करून योग्य ते पंचनामे करण्यात यावेत. आणि त्या कंपन्यांवरती कारवाई करण्यात यावी त्यांच्याकडून योग्य तो दंड आकारण्यात यावा अशा प्रकारच्या कंपन्यांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा. असे मनसे नेते रविश रासकर यांनी म हसूलमंत्र्यांना व जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघात तुतारीकडून तिसराच उमेदवार ?

वरिष्ठ पातळीवर हालचालींना वेग ? सुभाष जगताप यांच्या नावाची चर्चा

अक्षराज : विकास सरवळे

दि.११, पंढरपूर : राज्याच्या राजकारणात वरिष्ठ पातळीवर अनाकलनीय राजकीय घडामोडी घडत असतानाच सोलापूर जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत असलेल्या मोहोळ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातुन धक्का तंत्राचा अवलंब केला जाण्याची दाट शक्यता आहे.

या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळावी यासाठी अनेक दिग्गज ईच्छुक असले तरी याठिकाणी 'बदल हवा तर चेहरा नवा' ही राजनिती वरीष्ठ पातळीवर सुरू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. नुकतेच पुणे याठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटांच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर पुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे व महानगरपालीकेचे माजी सभागृह नेते आणि सोलापूर जिल्ह्याचे भुमिपुत्र सुभाष जगताप यांनी मोहोळ विधानसभेच्या संदर्भात चर्चा केली आहे. सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे खंदे समर्थक असुन अजित पवार गटास धक्का देत त्यांनी तुतारी चिन्हावर निवडणूक लढविण्यास ईच्छुक असल्याचे सांगितले आहे.निवडणुकीपुर्वी जगताप यांचे नाव या मतदारसंघात समोर येणार असल्याची शक्यता आहे.

मोहोळ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून उमेदवारी कोणाला मिळणार याबाबत सध्या राजकीय वर्तुळात तर्क बांधले जात आहेत. याठिकाणहुन माजी आमदार रमेश कदम, उद्योजक राजाभाऊ खरे, रॉकी बंगाळे यांची नावे चर्चेत असताना नविन ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. म हायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार यशवंत माने यांचे नावावर माजी

आमदार राजन पाटील यांनी शिक्कामोर्तब केल्याने महाविकास आघाडीकडून कोणत्या नावाचा विचार होणार याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. २०१९ च्या पंचवार्षिक निवडणुकीत याच म तदारसंघातून सुभाष जगताप यांनी जोरदार तयारी केलेली होती मात्र वरीष्ठ पातळीवर यशवंत माने यांचे नाव समोर आल्याने जगताप यांना ऐनवेळी माघार घ्यावी लागली होती. जगताप हे गेल्या चाळीस वर्षापासून पवार कुटूंबाशी व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर प्रामाणिक आहेत.अभ्यासु व्यक्तिमत्व म्हणून राज्यात ते परिचित आहेत. २०१९ मोहोळ विधानसभा राखीव मतदारसंघातून निवडणूक रिंगणात राष्ट्रवादीच्या माध्यमातून सुभाष जगताप यांचे नाव आघाडीवर होते.

त्यांनी निवडणूक लढविण्यासाठी म तदारसंघात संपर्क वाढवित कार्यकर्त्यांची मोटही बांधली होती. आत्ता पुन्हा २०२४ विधानसभेसाठी त्यांचे नावाची चर्चा सुरू असून वरीष्ठ पातळीवर नेत्यांकडून हालचाली सुरू आहेत. जगताप हे सोलापूर जिल्हाचे भुमिपुत्र असल्याने २०१९ ईच्छुक असताना त्यांना संधी मिळाली नाही त्यामुळे ते २०२४ मध्ये उमेदवारीचे दावेदार असु शकतात अशी ही चर्चा आहे.

आदिवासी नेते काळुराम धोदडे (काका) यांचे अल्पशा आजाराने निधन

अक्षराज : निलेश कासट

दि.११, पालघर : आदिवासी समाजाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे, जल जंगल जमीनवर आदिवासी, भूमिपुत्र शेतकऱ्यांचे अधिकारासाठी लढणारे, आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान, भूमी सेना आदिवासी एकता परिषदेचे संस्थापक काळूराम.का. धोदडे अर्थात आपले काका यांच्या जीवन संघर्षाची अखेर झाली. गुरुवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रात्री ११ च्या सेव्हन हिल्स हॉस्पिटल, मुंबई येथे त्यांची प्राणज्योत मालवली.पालघर जिल्हा हा सातत्याने संघर्ष करणाऱ्यांची भूमी राहिली आहे. या जिल्ह्याला घडवण्यात अनेकांचे हात आहेत. काहींनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे तर काही रचनात्मक कामातून या भागाचा विकास घडवत आहेत.

काळूराम धोदडे हे पूर्वी च्या ठाणे व सद्यस्थित पालघर जिल्ह्यातील मनोर जवळील दामखिंड कोंढाण गावात १९३६ साली त्यांचा जन्म झाला. काळूराम धोदडे यांचं नाव सर्वपरिचित आहे. आज वयाच्या ८४ व्या वर्षी देखील पायाला भिंगरी असल्यासारखे ते फिरत आहेत. एका गावातून दुसऱ्या गावात, एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात आणि संघटना किंवा आंदोलन संबंधित बैठक असल्यास अन्य राज्यात ही. तसेचपालघर-ठाणे जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश अशा विविध राज्यांतील आदिवासी भागात आज त्याचं नाव पोहोचलं आहे. आदिवासी एकता परिषदेतर्फे अलीकडे पालघर येथे आयोजित आदिवासी महासंमेलनाने हे अधोरेखित झाले आहे. आई-वडिलांनी पुढे त्यांना आश्रम शाळेत पाठवलं. आश्रमशाळेतच ते अकरावीपर्यंत शिकले. खरंतर इथून पुढे नोकरी करून ते स्थिरावला असते. पण शालेय जीवनापासूनच बंडखोर असलेल्या काळुराम यांनी (खरे तर सारे जण त्यांना काका किंवा काळूराम काका म्हणतात) आश्रम शाळेत आणि आपल्या गावात अवती-भवती जे पाहिलं, त्या सामाजिक वास्तवानं त्यांना स्वस्थ बसू दिलं नाही. त्यांनी अकरावीनंतर जंगल कामगार सोसायटीमध्ये नोकरी स्वीकारली. पण आदिवासींच्या उत्थानासाठी चालविण्यात येणाऱ्या या संस्थेमध्ये ही वेगळं काही घडत नाही हे पाहून तर त्यांच्या बंडखोर वृत्तीने अधिकच उचल खाल्ली. आदिवासींना त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार संबंधात वैयक्तिक अर्ज लिहून देण्याचं काम करताना त्यांनी आपल्यातील या वृत्तीला शालेय जीवनातच सक्रिय केलं होतं. आश्रम शाळेत शिकत असताना त्यांनी आश्रम शाळेतील गैरव्यवहार चव्हाट्यावर आणण्याचं काम केलं. सावकाराचे कर्ज, आदिवासींच्या जमि नीचं बिगर आदिवासींकडे हस्तांतरण, घरगडी- लग्न गडी स्वरूपातील वेठबिगारी, रोजगाराअभावी बाहेर जगायला जाणं, हे आदिवासी भागातील त्यावेळचे चित्र होतं. केंद्रात व राज्यात कॉंग्रेसची सत्ता असली तरी तत्कालीन ठाणे जिल्ह्यात आणि विशेषत: पालघर तालुक्यात त्या काळात समाजवादी पक्षाचं मोठं काम होतं. अनेक नेते या पक्षात सक्रिय होते. यातील मोरेश्वर म ेस्त्री यांच्या नजरेला हा तरुण आला. यातूनच हा तरुण समाजवादी मंडळीच्या संपर्कात आला. या दरम्यान समाजवादी पक्षातर्फे भूमिमुक्ती आंदोलन करण्यात आलं होतं. काळूराम या आंदोलनात उतरले. इतर आंदोलकांच्या जोडीला काळूराम यांनाही अटक झाली. तुरुंगातील या मुक्कामात त्यांचं वैचारिक संगोपन झालं आणि त्यांना लढण्याचे धडेही मिळाले. इथून सुरू झालेल्या काळूराम यांच्या प्रवासाने गेल्या ४० वर्षांत अनेक वळणं घेतली. नेतृत्वाचे गुण त्यांच्यात होतेच, पण अनुभवातून स्वत: शिकत, स्वत:ला घडवत.आपला समज आणि जाणिवांच्या कक्षा वाढवत त्यांनी आपल्यातील नेतृत्वाला समृद्ध ही केलं.

बिगर आदिवासींनी आदिवासींच्या बळकावलेल्या जमिनी उभ्या पिकासह ताब्यात घेऊन काळूराम यांच्या भूमिसेनेने इतिहास घडवला. यातूनच कूळ कायद्याखालील जमिनीचे दावे महसूल कार्यालयाऐवजी थेट जागेवर चालले आणि एका दिवसात सुमारे ८०० आदिवासींना त्यांच्या गम ावलेल्या जमिनीचा ताबा मिळाला. भूमिसेनेचे वेठबिगार मुक्ती आंदोलनही त्या काळात गाजले. रेती व्यवसाय उदयास आल्यानंतर त्यावरील हमाल, ड्रायव्हर अशा असंघटितासाठी मजूर संघटनाही याच दरम्यान स्थापन झाली. कूळ कायद्यातून मिळालेल्या जमिनींना उत्पन्नाचं साधन बनवावं म्हणून त्या काळात शेतीचा प्रयोग झाला. मात्र हा प्रयोग यशस्वी झाला नाही. भूमिसेनेने याच काळात जंगलावरील हक्कासाठीचा लढा लढवला. जंगलाचे आदिवासींच्या जीवनातील स्थान व महत्त्व लक्षात घेऊन जंगल बचाव आंदोलन ही भूमी सेनेने छेडले. आणीबाणीत २० कलमी कार्यक्रमाला काळूरामनं शोषणकर्ते आणि प्रस्थापितांविरोधातील लढाईचे हत्यार बनवले. या लढाईत एकदा पोलिसांची अमानुष मारहाण तर तीनदा जीवघेण्या हल्ल्यात तो बचावला. पालघर औद्योगिकरण व नागरीकरणाचे परिणाम या भागात दिसू लागले होते. याचा पहिला बळी अर्थातच आदिवासी ठरत असल्याचे त्यांना दिसू लागले. धरणे, महामार्ग अशा विविध प्रकल्पांसाठी आदिवासींच्या जमिनी संपादित केल्या जाऊ लागल्या. धरणं बांधली पण या धरणाचे पाणी थेट म ुंबई, वसई, भाईंदरला आणि आदिवासी मात्र पाण्यापासून वंचित. भूसंपादन तर झालं पण ना योग्य मोबदला ना योग्य पुनर्वसन. जंगलाचा मालक जंगलातूनच बेदखल होऊ लागला. आदिवासींच्या हातातून येथील जल, जंगल, जमीन आदी नैसर्गिक संसाधने हिसकावून घेतली जात आहेत. अलीकडील महाम ार्ग, बुलेट ट्रेन अशा विविध प्रकल्पांनी तर त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधनच नष्ट होत आहे की काय अशी भीती काळूराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वाटत आहे.

आदिवासींच्या हक्कासाठी लढाई आदिवासींनीच लढायला हवी. त्यांचं नेतृत्व आदिवासींनीच करायला हवं, हा विचार पुढे येऊ लागला आणि यातूनच आदिवासी एकता परिषदेची स्थापना झाली. अलीकडील वर्षांत काळूराम आदिवासी एकता परिषदेचं नेतृत्व करत आहेत. आपल्या या प्रवासात त्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणूक ही लढवली. मात्र, त्यांना यात यश आलं नाही .

भूमिसेना ते आदिवासी एकता परिषद या प्रवासात अखेर आपल्याला खरी वाट सापडली. शेवटी पर्यंत ते मोर्चा, आंदोलनात ते सहभागी झाली. काही महिन्यापासून त्यांना तब्येत साथ देत नसल्याने त्याच्यावर मुंबई येथे उपचार सुरु होते.अखेर वयाच्या ८४ व्या वर्षी जल, जंगल, जमीन या आदिवासी च्या हक्कासाठी लढणारे आदिवासीचे नेते काळूराम धोदडे ऊर्फ काका हे निसर्गवासी झाले. त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी अनेक राजकीय नेते, कार्यकर्ते, राज्यभरातून दाखल झाले होते. आदिवासी नेत्याला शेवटचा अंतिम जोहार..

थोडक्यात

प्रदीप नाईक यांना आमदार करा... मंत्री करण्याची जबाबदारी माझी : सूर्यकांता पाटील

अक्षराज : कैलास राठोड

दि.११, किनवट (नांदेड) : किनवट येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षप्रवेश सोहळा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन दि.१० रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रथमता देशाचे उद्योगपती रतनजी टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. या मेळावाच्या प्रसंगी व्यासपीठावर बोलत असताना तुम्ही प्रदीप नाईक यांना आमदार करा प्रदीप नाईक यांना मंत्री करण्याची जबाबदारी मी घेते कारण महाराष्ट्रात येणार सरकार हे महाविकास आघाडीचे असणार आहे प्रदीप नाईक यांना मी जवळून ओळखते मी गेल्या दहा वर्ष भाजपात असल्याने कदाचित प्रदीप नाईक हे पडले असतील मी पण भाजपात राहून गेली दहा वर्ष भरात वनवास भोगली मी निवडणूक लढवेल अथवा घडवणार नाही पण सक्रिय राजकारणातच राहणार आहे. मी कायमस्वरूपी तुमची राहणार आहे म्हणून किनवट माहूर मतदार संघाच्या पाठीशी राहणार आहे असे मत सूर्यकांता पाटील त्यांनी या पक्ष सोळा च्या निमित्ताने व्यक्त केले तर भविष्यातील आमदार हे प्रदीप नाईकच आहे असे मत भगवानराव आलेगावकर जिल्हाध्यक्ष यांनी व्यक्त केले याच व्यासपीठावर बोलत असताना किनाळकर यांनी एवढा मोठा पक्षप्रवेश सोहळा कधीही बघितला नाही सत्तेवर असलेली पक्षातील मंडळी ही ई. डी.सीबीआय ची भीती दाखवून पक्षांतर करत आहेत. गेल्या अडीच वर्षापासून महाराष्ट्रात बेकायदेशीर सरकार ही चालत असून न्याय यंत्रणा सुद्धा यांना घाबरत आहे. असे मत याप्रसंगी माजी राज्यमंत्री माधवराव किन्हाळकर यांनी व्यक्त केले आणि पदाधिकाऱ्याच्या उपस्थित शेकडो कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला.

नांदगाव विधानसभेसाठी महेंद्र बोरसे निष्ठावंत शिलेदार

अक्षराज : निवृत्ती शिंदे

दि.११, नांदगाव (नाशिक) : नांदगाव विधानसभा मतदारसंघातील जागा महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (शरदचंद्र पवार गट) सोडण्यात यावी अशी मागणी इच्छुक उमेदवारांकडून करण्यात आली आहे.

नांदगाव तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गटाचे) तालुका अध्यक्ष महेंद्र भाऊ बोरसे यांनी नांदगाव विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारसाठी नुकतीच मुलाखत दिलेली आहे,आपण नांदगाव विधानसभा निवडणूक लढण्यास इच्छुक आहोत. पक्षाने मला संधी द्यावी अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आहे.

त्यांच्यासोबतच सहकार अधिकारी बाजीराव शिंदे, विकी खैरनार,संगीता पाटील, सुधाकर सांगळे, यांनी देखील राष्ट्रवादी पक्षाकडून नांदगाव विधानसभेसाठी उमेदवारी मिळावी यासाठी मागणी केली आहे. पुण्यातील गुलटेकडी परिसरातील,निसर्ग मंगल कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे (शरदचंद्र पवार गट) उत्तर महाराष्ट्रातील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. नुकत्याच घेण्यात आलेल्या मुलाखतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) खासदार निलेश लंके, खासदार भास्कर भगरे सर व स्वतः शरदचंद्र पवार उपस्थित होते.

जाधवर इन्स्टिटयूटसच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा

अक्षराज : स्वामी दळवी

दि.१०, पुणे : लोकमान्य टिळक, आगरकर, चिपळूणकर यांची नावे पुण्यात शिक्षण क्षेत्रात संस्था सुरु करण्यात घेतली जातात. मात्र, काही वर्षात पुण्याबाहेरून आलेले

संस्थांचालक शिक्षण क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणात करीत आहेत. यांच्या योगदानाने विदयेच्या माहेरघराची परंपरा कायम राखली जात आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् च्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल, मानाजीनगर, न-हे येथे करण्यात आले. कार्यक्रमाला महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा हे अध्यक्षस्थानी होते. तर, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर यांच्या हिंदीतील आत्मचरित्रपर पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमात झाले. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सदानंद मोरे यांना, ज्येष्ठ बँकिंग तज्ञ ॲड.सुभाष मोहिते यांना सहकार क्षेत्रातील पुरस्कार, कर्नल विनोद मारवाह यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, उद्योग क्षेत्रातील पुरस्कार काका हलवाई ग्रुपचे युवराज गाडवे आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ.मिलिंद भोई यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे पुरस्कारांचे स्वरूप होते.

शेखर मुंदडा म्हणाले,प्रत्येकाच्या आयुष्यात होणारी वृद्धी, विकास आणि यश यामध्ये फरक आहे. केवळ वृद्धी नाही तर शिस्त, मानवता, संस्कार ही जीवनात महत्वाचे असतात. मला आयुष्यात केवळ वृद्धी मिळविण्यापेक्षा यशस्वी आयुष्य जगायचे होते, त्यानुसार मी सामाजिक जीवनात देखील वाटचाल केली. जीवनात चांगले कार्य करीत सकारात्मकता असायला हवी. तसे जीवन प्रत्येक व्यक्तीने व्यतीत केल्यास नक्कीच यश मिळू शकेल.

ॲड.सुभाष मोहिते म्हणाले,शिक्षण संस्था चालविणे हे सोपे काम नाही. केवळ शैक्षणिक संस्थेचा विचार करण्यापेक्षा समाजाचा व देशाचा विचार करणे ही धारणा निर्माण करणारे शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षणाचा बाजार झाला आहे, ही केवळ चर्चा ऐकतो. आता केवळ पदवी घेऊन उपयोग नाही, तर कौशल्याधिष्ठित शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यानि घेणे ही गरज निर्माण झाली आहे.डॉ. मिलिंद भोई म्हणाले,शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण खूप चांगल्या पद्धतीचे देत आहोत. पण आज शिक्षणासोबतच संस्कार देण्याची आवश्यकता आहे. फक्त शिक्षण देऊन चालणार नाही. तर, संस्कार देणे गरजेचे आहे. प्रत्येक घरात संस्कार देणारी आजी, आई, मावशी आज कुठेतरी हरवली आहे, असे सांगत सशक्त पिढी घडविण्यासाठी व्यसनांपासून दूर रहायला हवे, असेही ते म्हणाले.कर्नल विनोद मारवाह म्हणाले,आपण स्वतःवर विश्वास ठेवायला हवा. मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न देखील प्रत्येकाने करायला हवा. त्यासाठी आपला विचार पक्का असणे गरजेचे आहे. समाजमाध्यमे ही आपला वेळ वाया घालविण्याची माध्यमे आहेत. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करून सकाळी लवकर उठून अभ्यास व आपली कामे करायला हवीत.ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले,अग्निशमन दल, पोलीस, पत्रकार, सैन्यदल आणि रुग्णवाहिका चालकांच्या मुलांना केजी ते पीजी पर्यंतच्या शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येते. तसेच ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांनी संस्थेत प्रवेश घेतल्यास शैक्षणिक शुल्कात १५ टक्के सवलत शिष्यवृत्तीच्या रुपात दिली जाते. विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देत त्यांना समाजातील प्रेरणादायी व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे, यादृष्टीने विविध उपक्रमांच्या माध्यमातून संस्थेचे प्रयत्न सुरु असतात, असेही ते म्हणाले.